माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /३६७८/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उत्तम भागचंद लुंकड	शिरस्तेदार उप अधीक्षक भूमी अभिलेख हवेली यांचे कार्यालय, जि. पुणे	उप अधीक्षक भूमी अभिलेख उप अधीक्षक भूमी अभिलेख हवेली यांचे कार्यालय, जि. पुणे

(सुनावणी दिनांक- १४.०७. २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. ०८.०९.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती देण्यास दिरंगाई, टाळाटाळ करत असल्याबाबत असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
२४.०४.२०२५	मौजे खराडी (चंदननगर) येथील सर्वे नं.४९/२,प्लॉट क्र. ३५ या मिळकतीबाबत दि.०८.०३.२०२५ रोजी ॲड. राजीव नंदा यांच्या मार्फत नोटीस पाठविली होती. सदर नोटीसीस आपण कोणती कार्यवाही केली अथवा केली नसल्यास त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, "चुकीची मोजणी झाल्याने अहवाल मागणी केला होता माहिती दिली नाही." त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " नोटीशीस कार्यालयाकडून कार्यवाही झालेचे दिसुन येत नाही असे उत्तर अपिलार्थींना दि. ०७.०७.२०२६ रोजी दिले आहे. "

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला उत्तर / माहिती दिल्याचे दिसून येत नाही. त्यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे. या गंभीर निष्काळजीपणाबद्दल आयोगाद्वारे त्यांना समज देण्यात येत आहे. भविष्यात प्राप्त होणा-या माहिती अर्जावर कार्यवाही करताना त्यांनी माहिती अधिकार कायदयातील सर्व संबंधित तरतुदींचे काटेकोरपणे आणि विहीत

कालमर्यादेत पालन करावे, अन्यथा त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाहीची शिफारस प्रस्तावित करण्यात यईल याची समज देण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.१२.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा अभिलेखात शोध घेऊन आवश्यक ती माहिती अर्जदार यांना पुरवावी. माहिती उपलब्ध नसलेस तसे स्पष्टपणे अर्जदार यांना कळवावे असे आदेश दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिल आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती / उत्तर दिल्याचे दिसून येत नाही. द्वितीय अपिलाचे नोटीस प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०७.२०२६ रोजी उत्तर दिल्याचे दिसून येते.

प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय हवेली, जि. पुणे यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती / वस्तुनिष्ठ उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार शीघ्र डाकेने विनामुल्य उपलब्ध करून द्यावे. तसेच माहिती अर्जात नमूद कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर तसे अपिलार्थी यांना लेखी पत्राने कळविण्यात यावे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधीक्षक भूमी अभिलेख, हवेली, जि. पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ / ३६७८/२०२५/पुणे 4858 दिनांक - 21/10/26

रामाआ-पुणे/२०२५/NSB